# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.11.2024** **वारःशुक्रवार**

---

1. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराला वेग; ज्येष्ठ भाजपा नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आज दोन प्रचार सभा
2. झारखंडमध्येही विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला
3. परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर आज सिंगापूरमध्ये असियान भारत गोलमेज परिषदेला संबोधित करणार
4. भारताचा उदयोन्मुख बुद्धिबळपटू अर्जून इरिगाईसी जागतिक बुद्धिबळ क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर आणि
5. भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यानचा पहिला टी 20 क्रिकेट सामना आज डर्बनमध्ये

**<u>पंतप्रधान महाराष्ट्र</u>**

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांच्या प्रचारासाठी ज्येष्ठ भाजपा नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दौरा आजपासून सुरू होणार आहे. येत्या 14 नोव्हेंबर पर्यंत धुळे, नाशिक, अकोला, नांदेड, चंद्रपूर, चिमूर, सोलापूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई आणि मुंबई इथं पंतप्रधानांच्या प्रचार सभा होणार आहेत. आपल्या महाराष्ट्र दौऱ्यात ते आज धुळे आणि नाशिक जिल्ह्यात प्रचार सभांना संबोधित करतील. महाराष्ट्रातले मतदार महायुतीलाच निवडून देतील असा विश्वास त्यांनी समाजमाध्यमांवरील संदेशात व्यक्त केला आहे. भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहा हे देखील आज राज्याच्या दौऱ्यावर असून त्यांच्या सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात विविध ठिकाणी सभा होणार आहेत.

**<u>कॉंग्रेस प्रचार सभा</u>**

महाराष्ट्र विधानसभा निवणुकीच्या पार्श्वभूमीवर, राज्यात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, यांच्यासह काँग्रेसचे वरिष्ठ नेते राज्याच्या विविध भागांत काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेणार असल्याची माहिती कॉंग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. 10 नोव्हेंबर रोजी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविकास आघाडीचा जाहिरनामा प्रसिद्ध केला जाणार असल्याचंही ते म्हणाले.

**<u>कॉँग्रेस बंडखोर</u>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत कॉँग्रेसच्या बंडखोर उमेदवारांना पक्षविरोधी भूमिका घेतल्याबद्दल आता कारवाईला समोर जाव लागणार असून, त्यांना पुढील सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात येणार असल्याची माहिती कॉँग्रेसचे कार्यकारी सचिव आणि महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथाला यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील कॉँग्रेसच्या बंडखोर उमेदवारांची यादी करण्याच्या सूचना दिल्या असून, त्यांना नोटिस पाठवण्यात येईल आणि निलंबित करण्यात येईल आस ते म्हणाले. राज्यात कुठेही मैत्रीपूर्ण लढती होणार नसल्याच ही त्यांनी स्पष्ट केल.

**<u>शरद पवार सभा</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काल पूर्व नागपूर आणि गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा विधानसभा मतदारसंघातील महविकास आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा घेतल्या.

**<u>झारखंड प्रचार</u>**

झारखंडमध्ये विधानसभेच्या पहिल्या टप्प्यासाठी काल, एनडीए आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांच्या निवडणूक सभा पार पडल्या. हजारीबाग इथल्या प्रचारसभेत केंद्रीय मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या कारभारावर टीका करत नागरिक त्यांच्या चुकीच्या कारभारावर नाखूष असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तर झारखंड मुक्ती मोर्चाच्या कल्पना सोरेन यांनी भाजपवर टीका करत त्यांच्या सत्ताकाळात राज्य पिछाडीवर गेल्याचं म्हटलं आहे. काँग्रेस, आरजेडी, एजेएसयू आणि डाव्या पक्षांच्या नेत्यांनीही राज्याच्या विविध भागात निवडणूक रॅलींना संबोधित केले.

**<u>एस जयशंकर</u>**

परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर आजपासून सिंगापूर दौऱ्यावर असून ते आज 8 व्या असियान भारत गोलमेज परिषदेला संबोधित करणार आहेत. असियान दक्षिण पूर्व आशियाई देशांशी संघटना आहे. जयशंकर या दौऱ्यात सिंगापूरचे राष्ट्रपती आणि पंतप्रधानांची भेट घेऊन त्यांच्याशी द्विपक्षीय संबंध मजबूत करण्याच्या दृष्टीने चर्चा करणार आहेत. भारत आणि सिंगापूर दरम्यान 1990 पासून अत्यंत मजबूत द्विपक्षीय संबंध असून, भारताला अग्नेय आशियाई देशांशी जोडण्यात सिंगापूरची महत्वपूर्ण भूमिका आहे. विशेषतः भारताने लुक ईस्ट पॉलिसी अमलात आणल्यापासून या संबंधात जास्त सुधारणा झाली आहे.

**<u>सैन्य परंपरा उत्सव</u>**

नवी दिल्लीत आज पासून दुसऱ्या सैन्य परंपरा उत्सवला सुरुवात होत असून सर सेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांच्या हस्ते आणि तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांच्या उपस्थितीत त्याच उद्घाटन होणार आहे. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा धोरण, परराष्ट्र नीती, लष्कराचा इतिहास आणि वारसा परंपरा यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या जागतिक आणि भारतीय तज्ञ सहकारी, सार्वजनिक आणि खासगी उपक्रम, शिक्षणतज्ज्ञ आणि संशोधन क्षेत्रातील विद्वावांना सहभागी करून घेणे हा महोत्सवाचा उद्देश आहे. त्याचबरोबर लष्कराच्या शौर्य

गाथा प्रकल्पाचा शुभारंभही होणार आहे. शिक्षण आणि पर्यटनाच्या माध्यमातून भारताच्या लष्करी वारशाचं संवर्धन आणि प्रसार करणे हा याचा उद्देश आहे.

**युके निर्बंध**

ब्रिटननं रशियाच्या लष्करी औद्योगिक संकुलावर नवीन 56 निर्बंध लादले आहेत. युक्रेनशी सुरू असलेल्या युद्धात लष्करी साधन सामग्रीचा पुरवठा रोखण्याच्या दृष्टीनं हे निर्बंध लादले आहेत.

**छट पूजा**

उत्तरभारतात मोठ्या प्रमाणात साजऱ्या होणाऱ्या छट पूजेच चार दिवसाच महापर्व आज संपत आहे. आज या सूर्यपूजेचा आज शेवटचा दिवस असून सूर्योदयाच्या वेळी उषःकालीन अर्घ्य देण्याचा महत्वपूर्ण धार्मिक विधी करण्यासाठी बिहार आणि उत्तर भारतातील अनेक नद्यांच्या छटघाटांवर लाखों भाविकांनी पहाटेपासून गर्दी केली आहे. बिहारमधील गंगा, गंडक, कोसी महानंदा, बागमती आदि नद्यांवर भाविक पूजेच साहित्य आणि फळांच्या करंड्या घेऊन सूर्यनारायण आणि छटी मैया यांची पूजा करत आहेत. पूजेनंतर परण हा विधी असून त्याद्वारे भाविक प्रसाद ग्रहण करून आपला 36 तासांचा उपवास सोडतात.

**रेल्वे गाड्या**

रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी भारतीय रेल्वे आजपासून 164 विशेष गाड्या चालवणार आहे. यादृष्टीनं रेल्वेनं सुमारे 476 गाड्यांचं नियोजन केलं आहे. दरम्यान मागच्या छत्तीस दिवसांमध्ये 4 हजार 521 रेल्वे गाड्या चालवण्यात आल्या असून 65 लाख प्रवाशांनी याचा लाभ घेतल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली आहे. या महिन्याच्या 4 तारखेला एकाच दिवसात तीन कोटींपेक्षा जास्त प्रवाशांनी रेल्वे प्रवास केल्याचंही मंत्रालयानं कळवलं आहे.

**उडीद डाळ**

केंद्र सरकारनं दिलेल्या माहितीनुसार, भारतात होणाऱ्या उडदाच्या आयातीत ब्राझील हा प्रमुख पुरवठादार देश म्हणून उदयास आला आहे. उडदाची आयात 4102 टनावरून वाढून ऑक्टोबर अखेरपर्यंत 22 हजार मेट्रीक टन पेक्षा अधिक होणार आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, अलीकडच्या काळात भारताच्या उडीद आणि तूर आयातीचा ब्राझील हा प्रमुख स्त्रोत देश होण्याची शक्यता आहे.

**जम्मू व्हीडीसी**

जम्मू आणि काश्मिर खोऱ्यातल्या किश्तवर जिल्ह्यात काल ग्राम संरक्षण समितीच्या दोन सदस्यांचं दहशतवाद्यांनी अपहरण करून जंगलात नेऊन हत्या केली. नजीर अहमद आणि कुलदीप कुमार अशी मृतांची नावं आहेत. जम्मू आणि काश्मिरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला आणि नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष

फारूख अब्दुल्ला यांनी हत्येचा निषेध केला आहे. जम्मू आणि काश्मिरचे नायब राज्यपाल लेफ्टनंट मनोज सिन्हा यांनीही या हल्ल्याचा निषेध केला आहे.

**जम्मू सोपोर**

दरम्यान, काल रात्री जम्मू आणि काश्मिरच्या सोपोर भागात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक सुरू झाली आहे. लष्कराकडून आलेल्या अधिकृत बातमीनुसार, सोपोरच्या पाणिपोरा परिसरात दहशतवाद्याचा गट लपला असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर झालेल्या संयुक्त शोधमोहिम सुरू करण्यात आली होती. गेल्या अठ्ठेचाळीस तासात, दोन दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात लष्कराला यश आलं आहे.

**अर्जून इरिगासी**

भारताचा उदयोन्मुख बुद्धिबळपटू अर्जून इरिगाईसीनं फिडे जागतिक बुद्धिबळ क्रमवारीत दुसरे स्थान पटकावलं आहे. काल चेन्नई ग्रांड मास्टर्स स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीअखेर त्यानंतर ॲलेक्सी सरानावर विजय मिळवला. 21 वर्षीय अर्जुननं ही उल्लेखमीय कामगिरी केली आहे. सरानाविरूद्धच्या विजयानं अर्जुन क्रमवारीत वरची पायरी चढला आहेच शिवाय त्याला मास्टर्स श्रेणीतही आघाडी मिळाली आहे. स्पर्धेच्या तीन फेऱ्यांअखेर, अर्जुन, इराणचा ग्रॅण्डमास्टर अमीन तबाटाबैई यांच्याबरोबर गुणतालिकेत शीर्षस्थानी आहे. काळ्या सोंगट्यांसह खेळताना अर्जुनने त्याच्या रणनीती कौशल्य दाखवत प्रतिस्पर्ध्यालाही चकित केलं.

**क्रिकेट-टी 20**

भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यानच्या चार टी-20 क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज रात्री डर्बनमध्ये होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेआठ वाजता सामन्याला सुरूवात होईल. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली दक्षिण अफ्रिकेच्या दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघाला परदेशी भूमीवर उत्तम कामगिरी दाखवण्याची संधी आहे. या संघानं घरच्या मैदनावर बांग्लादेश विरूद्धची टी-20 मालिका 3-0 नं जिंकली होती. सध्या भारतीय संघ टी-20 संघ क्रमवारीत अव्वल स्थानावर तर दक्षिण अफ्रिका सहाव्या स्थानावर आहे.

**टेनिस**

भारताचा टेनिसपटू रित्विक चौधरी बोल्लीपल्ली आणि त्याचा साथीदार पोर्तुगालचा फ्रान्सिस्को कॅब्राल यांचा आज मोसले खुल्या स्पर्धेत पुरूष दुहेरीच्या उपांत्य फेरीत फ्रेंच जोडीशी मुकाबला होणार आहे. या जोडीनं उपांत्यफेरीत अग्रमानांकित मेक्सिकन-फ्रेंच जोडी सँटियागो गोन्झालेझ आणि एडवर्ड रॉजर-व्हॅसेलिन यांचा 7-6, 6-4 असा पराभव केला आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.